



रयत शिक्षण संस्थेचे,

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.

मराठी विभाग सन २०२२-२३

कै.पी.बी.साळुंखे व्याख्यानमाला

दि.१३ जानेवारी २०२३

# अहवाल

महाविद्यालयामध्ये शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि महाविद्यालयाचा मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कै.पी.बी.साळुंखे व्याख्यानमाला शुक्रवार दि.१३ जानेवारी रोजी संपन्न झाली. 'महात्मा ज्योतीराव फुले जीवन व कार्य' या विषयावर मा.डॉ.प्रमोद पांडव उपकुलसचिव शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. आपल्या मनोगतात डॉ. पांडव म्हणाले की, 'महात्मा ज्योतीराव फुले यांचे कार्य हे समाजाला दिशा देणारे होते. तत्कालीन समाजातील अनिष्ट रूढी,प्रथा, परंपरांना फाटा देत, समाजाचा रोष पत्करत त्यांनी समाजोद्धाराचे कार्य केले. आज मुले-मुली एकत्र शिक्षण घेतात याचे सर्व श्रेय हे फुले दाम्पत्याला जाते.' महात्मा फुले हे खऱ्या अर्थाने युग पुरुष आणि सावित्रीबाई फुले युग स्त्री होत्या.' असे विचार त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.डी.कदम यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. यावेळी विचार पिठावर कै.पी.बी.साळुंखे यांचे नातू मा.श्री.अभिजित साळुंखे उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक महाविद्यालयाच्या उपप्राचार्या व मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.सिंधू आवळे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.डॉ.भाग्यश्री पुणतांबेकर यांनी करून दिला. आभार प्रा.अंकुश घुले यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ.महेश रणदिवे यांनी केले. या कार्यक्रमासाठी सर्व विभागाचे विद्यार्थी व प्राध्यपक, शिक्षकेतर सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**परिणाम/निष्पती**

- विद्यार्थ्यांना महात्मा फुले यांच्या जीवनकार्याविषयी माहिती मिळाली.
- विद्यार्थ्यांना कै.पी.बी.साळुंखे यांच्या विषयी माहिती मिळाली.
- विद्यार्थ्यांमध्ये सामजिक जाणीव निर्माण झाली.

**लाभार्थी**

**137**





प्रा. डॉ. सिंधू जयवंत आवळे
मराठी, विभाग प्रमुख

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE KOLHAPUR

Principal,
Rajarshi Chh. Shahu College
Kolhapur.